थोडक्यात

आदर्शवत व्यक्तित्व लोभाजी डोंगरे यांचे दुःखद निधन

तलवाड़ । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील सर्व परिचित आसलेले आदर्शवत व्यक्तित्व लोभाजी चोखाजी डोंगरे वय वर्ष (७५) यांचे दिं.१८/१२/०२४ रोजी सकाळी दहा वाजता अल्पशा आजाराने राहात्या घरी दु.खद निधन झाले. तलवाडा येथील जि. प. शाळेचे मुख्याध्यापक विजय कुमार डोंगरे सर यांचे ते वडील होते. अत्यंत मनस्वी मनमिळाऊ वृत्ती अंगी बाळगने हा त्यांचा स्वभाव प्रतेक वाट सरुंना प्रेम जिव्हाळ्याने सातत्याने विचारपुस करने हा त्यांच्या जिवनातील म्हत्वाचा पैलु होता. त्यांच्या अचानक जाण्याने डोंगरे परिवार मोठ्या प्रमाणात दुखांकित आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, नात नातु सोनबाई आसा मोठा परिवार असुन. त्यांचा अंत्यविधी संध्याकाळी ५-१५ वाजता तलवाडा येथील बौद्ध स्मशानभूमीत करण्यात आला. डोंगरे परिवाराच्या दुःखात दैनिक मराठवाड़ा पत्र परिवार दुखांकित अंतकरणाने सहभागी आहे.

भगवान दत्तात्रय हे जीवनासाठी दिशादर्शक: स्वामी डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ ज्योतिर्लिंगाच्या पूर्वेस सारडगाव पंचक्रोशीत वसलेल्या श्री क्षेत्र दत्तधाम अध्यात्मिक उन्नती केंद्रात भगवान दत्तात्रय जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संत साहित्याचे अभ्यासक व प्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांनी आपल्या सुमधुर वाणीत उपस्थितांना मार्गदर्शन केले. उगुट्टे महाराज म्हणाले की, भगवान दत्तात्रय हे जीवनासाठी दिशादर्शक देवता आहेत. भक्ती ही सर्वात श्रेष्ठ आहे, कारण भक्तीनेच जीवनात चित्त निर्मळ होऊन ईश्वरप्राप्ती साधता येते. अनुसया म्हणजे असुयेपासून मुक्त बुद्धी आणि अत्रि ऋषी म्हणजे त्रिगुणांच्या पलीकडे गेलेली अवस्था. अशा निर्मळ चित्ताच्या पोटी भगवान दत्तात्रय प्रकट होतात.त्यांनी पुढे सांगितले की, दत्त म्हणजे चित्त. जेव्हा चित्त निर्मळ होते, तेव्हा ईश्वर आपले काम आपोआप पूर्ण करतो. अनुसया व अत्रि ऋषी यांचे कर्मश्रेष्ठ असल्याने ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रिमूर्तींनी त्यांच्या आश्रमात येऊन उपदेश दिला. भगवान दत्तात्रयांनी धर्माचे अधिष्ठान मानण्यासाठी भारतभर भ्रमण केले व विश्वाला योग्य दिशा दिली. परम राध्य परमधर्माधीश उत्तराम्नाय ज्योतिष्पीठाधीश्वर जगद्गुरु शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती १००८ यांच्या शुभहस्ते प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर प्रथमच दत्त जन्मोत्सव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रल्हाद महाराज घुले यांचे भक्तिमय कीर्तन झाले, तर डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांनी आपल्या अमृततुल्य प्रवचनातून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिनिमित्त अभिवादन व महाप्रसादाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी



ज्या महापुरुषांचा आधुनिक भारताला अभिमान असायला हवा, त्यात राष्ट्रीय संत गाडगे बाबा यांचं नाव आल्याशिवाय राहत नाही. असे निस्वार्थ कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची शुक्रवार दि.२० डिसेंबर २०२४ रोजी पुण्यतिथी आहे. त्या निमित्त पुतळ्यास अभिवादन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून बीडकरांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन परिट धोबी समाजाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष ॲड.सुधीर जाधव यांनी केले आहे. दरवर्षी प्रमाणे परीट धोबी समाजाच्यावतीने राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची पुण्यतिथी समाजोपयोगी कार्यक्रमाने साजरी केली जाते. याही वर्षी राष्ट्रसंत गाडगे महाराजांची ६८ वी पुण्यतिथी शुक्रवार दि.२० डिसेंबर २०२४ रोजी साजरी केली जाणार असून या निमित्त बीड शहरातील गाडगे बाबा यांच्या पुतळ्यास सकाळी ११ वाजता अभिवादन करण्यात येणार असून त्यानंतर परिट समाजाचे सांस्कृतिक सभागृह मोंढा रोड, बीड येथे दुपारी १२.०५ वा. प्रतिमेचे पुजन करुन महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजीत केलेला आहे. राष्ट्रसंत गाडगे महारांची पुण्यतिर्थी निमित्त महाप्रसादाच्या कार्यक्रमाला सर्व समाज बांधव व बीडकरांनी या दोन्ही कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन परीट धोबी समाजाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष ॲड. सुधीर जाधव, माजी प्रदेश अध्यक्ष गणेश जगताप, शहराध्यक्ष अंबादास नवले, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, जिल्हाध्यक्ष श्रीमंत गोतावळे, शिवसेना उप जिल्हाप्रमुख अजय जाधव, पप्पु शिंदे, जिल्हा सचिव जगन्नाथ शिंदे, विलास जाधव, शहर सचिव जयंत राऊत, रवि जाधव, जिल्हा सचिव प्रविण साळुंके, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, गणेश राऊत, जिल्हा कार्याध्यक्ष संजय साळुंके, उपाध्यक्ष शितल राऊत, जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे, कोषाध्यक्ष संतोष भालेकर, शहर - सहसचिव अतुल साळुंक, प्रा. विजय जाधव, संदीप जाधव, अमोल काळे, मनोज नवले, संजय नवले, शहर परीट धोबी समाज सेवा मंडळ व संत गाडगे बाबा तरुण परीट समाज सेवा मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

गेवराई शहरांमध्ये महावितरण कडून विजचोरीची मोठी कारवाई

गेवराई । प्रतिनिधी

शहरांमध्ये ज्या भागांमध्ये वीजचोरीचे मोठे प्रमाण आहे अशा भागामध्ये काल दि १७ रोजी महावितरण गेवराई यांनी मोठी कारवाई केली आहे. पुढील तीन ते चार दिवसाच्या काळात अशाच प्रकारचे आकडे बहाद्दरांवर कारवाई करून भा.दं.वि. १३५ नुसार गुन्हे नोंद केले जाणार आहेत अशी माहिती आमच्या प्रतिनिधींना महावितरण कडून मिळाली.

सध्या अतिभारामुळे आपला विद्युत पुरवठा सकाळी वारंवार खंडित होत आहे, त्यामुळे महावितरण विरुद्ध ग्राहकांचा रोष वाढत आहे. त्याबाबत महावितरणला आमच्या प्रतिनिधींनी संपर्क केला असता त्यांनी विद्युत पुरवठा वारंवार खंडित होण्यामागिल प्रमुख कारणे सांगितली, 'सध्या हिवाळ्यामुळे प्रत्येक घरामध्ये रूम हिटर, पाण्याचे हिटर, शेगडी यांचा वापर वाढला आहे, सदर वापर सकाळच्या वेळी जास्त होत असल्याने गेवराई मधील सर्व फिडर अतिभारीत होत आहेत.'

सदर विद्युत पुरवठा खंडित न होण्यासाठी महावितरण कडून खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१. घरावरील पाण्याच्या टाक्या सकाळी न भरता रात्रीच भरून ठेवाव्यात.

२. जर आपल्या भागात पाणी आले असेल तर पाण्याची मोटार चालु करून त्याऐवजी इतर जास्त भाराची विद्युत उपकरणे बंद करावीत.उदा. पंखा, टी. व्ही., फ्रिज, इ.

३. सकाळच्या वेळी आपण एखादे जास्तीचे उपकरण चालू करत असाल तर दुसरे एखादे न गरजेचे/कमी गरजेचे विद्युत उपकरण बंद ठेवावे.

आपण सदर उपाययोजना अंमलात आणल्यास आपला विद्युत पुरवठा सकाळी वारंवार खंडित होणार नाही.

विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूल, केज येथे आयोजित विविध क्रिडा स्पर्धा संपन्न

पाच दिवसीय क्रिडा स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

केज । प्रतिनिधी

केजच्या विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूल येथे पाच दिवसीय वार्षिक क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या पहिल्या दिवसी विद्यार्थ्यांनी शहरातील धारुर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी केजच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, गटशिक्षण अधिकारी लक्ष्मण बेडसकर, पत्रकार विनोद शिंदे, व्यापारी सूर्यकांत चवरे, व्यापारी धनराज पुरी व वैद्यनाथ बँकेचे व्यवस्थापक श्री. डी. एन. बरदाळे यांच्या शुभहस्ते ज्योत प्रज्वलित करत क्रिडा स्पर्धे चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी आदर्श कोचिंग क्लासेस धारूरचे संचालक श्री.नितीन शुक्ला,एमबीबीएस ऑफिसर सुधाकर शेळके,कृष्णा अर्बन बँकेचे सिईओ वासुदेव मुंडे यांची उपस्थिती होती.दरम्यान केज शहरात विद्यार्थ्यांनी काढलेलेल्या मशाल रॅलीने केज वासियांचे लक्ष वेधून घेतले होते.

केज शहरातील विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूल येथे पाच दिवसीय वार्षिक क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान पाच दिवस चाललेल्या क्रिडा स्पर्धेत विविध प्रकारचे खेळ घेण्यात आले.यामध्ये विक्रम राव मुंडे पोदार लर्न स्कूलचे सर्व विद्यार्थी, विद्यार्थ्यांनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत क्रिडा क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कौशल्य दाखवले. स्पर्धेच्या सांगतेला शिक्षण विस्तार अधिकारी सुनील केंद्रे,बनसारोळा गावचे सरपंच अजित गोरे,एस,बी,आय बँकेचे शाखाधिकारी आदित्य गाजरे, विश्वनाथराव कराड विद्यालयाच्या प्राचार्या माधुरीताई मुंडे यांच्या शुभहस्ते विद्यार्थांना बक्षिस (मेडल) वितरण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी स्पर्धेत भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.दरम्यान क्रिडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या कलागुणां बद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.विक्रमराव (बप्पा) मुंडे, संस्थेचे सचिव श्री.अतुल (दादा)

मुंडे, उपाध्यक्ष श्री.विजयकांत (भैय्या) मुंडे, प्राचार्या माधुरीताई मुंडे, शाळेच्या प्राचार्या अभिलाषा सारंगदेवत,उपप्राचार्य राहुल पवार सर, श्रीमती राधा भंन्साळी,श्री. सुहास काळे सर, श्री.धनंजय मस्के सर, श्री.राजु शेळके सर,श्री.अमर शिंदे सर, श्रीमती. शुभांगी सगरे मॅडम, श्रीमती.अश्विनी गलांडे मॅडम, श्रीमती.कविता मॅडम श्रीमती. सुमया अतार मॅडम,श्रीमती.झीनत शेख मॅडम श्रीमती.घोळवे मॅडम श्रीमती.रत्नगीता पाटील मॅडम श्रीमती दीपाली राजमाने मॅडम यांनी विषेश परीश्रम घेतले.

खालापूर बीटस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा वडगाव येथे संपन्न

श्री स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने बक्षीस वितरण

रायगड । प्रतिनिधी

रायगड जिल्हा परिषद आयोजित व पंचायत समिती खालापूर अंतर्गत खालापूर बीटस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे पार पडल्या, या स्पर्धेत वडगाव शाळेने चमकदार कामगिरी करत समुहगान दोन्ही गटात प्रथम क्रमांक पटकावत, मातीचे शिल्प या मोठ्या गटात प्रथम,वाशिवली ठाकूरवाडी छोट्या गटात प्रथम , तर मुली लंगडी त प्रथम क्रमांक मिळवत माजगाव केंद्रासाठी तालुक्यातील दार उघडून दिले आहे.यावेळी व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धांचे उधघाटन श्री.मोहिते केंद्र प्रमुख सावरोली यांच्या हस्ते करण्यात आले,तर क्रीडा स्पर्धेचे उदघाटन दुपारी मा.कैलास चोराम ले गटशिक्षणाधिकारी खालापूर

यांच्या हस्ते करण्यात आले.स्पर्धा अत्यंत खेळीमेळीच्या व खिलाडू वातावरणात संपन्न झाल्या.नियोजन व तयारी उत्तम असल्याचे बोलत प्रत्येक शिक्षक व अधिकाऱ्यांनी वडगाव शाळेच्या मुख्याध्यापकांची व सर्व सहकारी शिक्षकांचे कौतुक केले. तसेच जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवत खालापूर तालुक्याची मान उंचावल्याबद्दल शिक्षण विस्तार अधिकारी शिल्पा दास यांनी खालापूर शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, व्यवस्थापन समिती चे गटशिक्षणाधिकारीचोरामले यांच्या हस्ते प्रमाणपत्र व चषक देऊन गौरव केला. या कार्यक्रमासाठी आकर्षक चषक व प्रमाणपत्र श्री स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट तुपगाव च्या सौजन्याने प्रदान करण्यात आले .यावेळी ट्रस्टचे मा. श्री. सिद्धेश्वर पाटील, मा. श्री.दिलीप साळुंखे, मा.विजय शिंदे व श्री.शिवाजी देशमुख उपस्थित राहून बक्षीस वितरण केले.सदर स्पर्धेसाठी पंच

> *खिलाडूवृत्ती विकासनासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या आहेत. - शिल्पा दास शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती खालापूर*

म्हणून श्रीम. रणदिवे,श्रीम.म्हात्रे, श्रीम.सरवाडे व दीपा परब पोषम आहार अधीक्षक वर्ग-ब या स्वतः उपस्थित होत्या.तर क्रीडा स्पर्धे साठी श्रीम.जयश्री सुर्वे, दीपक अकोलकर, संतोष बडे, वैशाली गायकवाड, रेखा जाधव, विनोद लंके आदींनी काम पाहिले.कार्यक्रम ाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी केले तर सूत्रसंचालन मस्तान बोरगे सरांनी केले. कार्यक्रम ासाठी शाळेतील शिक्षक वैजनाथ जाधव, सरस्वती कवाद, मयुरी धायगुडे यांच्या सह स्वयंसेविका व शाळा व्यवस्थापन समिती यांनी परिश्रम घेतले.

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात एड्स जनजागृती व्याख्यान संपन्न

नेकनूर । प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर व एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र स्त्री व कुटीर रूग्णालय, नेकनूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब अंतर्गत एचआयव्ही. एड्स जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी. के तर अतिथी म्हणून वैद्यकीय अधीक्षक डॉ. हुबेकर ए. आर., समुपदेशक गोरे एस. एस.यांची उपस्थिती होती. जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रूग्णालय, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली 'जागतिक एड्स पंधरवडा' निमित्ताने सदरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना गोरे एस. एस. यांनी म्हटले की, एड्स हा रोग ह्युमन इम्युनो डेफिशियन्सी व्हायरस (एचआयव्ही) द्वारे होतो. एचआयव्ही शरीरातील रोगप्रतिकारक पेशी नष्ट करतो किंवा त्याचे नुकसान करतो. तसेच त्यांनी एड्स लक्षणे व घ्यावयाची काळजी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. डी. के. ढास यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की,१ डिसेंबर प्रत्येक वर्षी जागतिक एड्स दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. मुजावर एस. टी. तर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अंकुश काळे यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यायातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तूरीचा वाण भारी: महाबीज गोदावरी, महाबीजचा पिक प्रात्यक्षिक कार्यक्रम उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. अकोला अर्थात महाबीज, हा एक राज्य शासनाचा अंगीकृत व्यवसाय असलेला बियाणे क्षेत्रातील अग्रगण्य उपक्रम आहे, राज्य शासन तथा महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक याच्या संकल्पनेतून महाबीज नावाच्या बियाणे महामंडळाचे रोपटे १९७६ साली विदर्भातील अकोला येथे उभे राहिले, व तो आज राज्यातील बियाणे क्षेत्रातील अग्रगण्य वटवृक्ष म्हणून ताठ मानेणे उभा आहे. राज्यातील महाबीज हि एकमेव कंपनी आहे, कि भारतीय बियाणे कायद्याच्या पूर्ण चौकटीत काम करून १०० % उच्च गुंणवत्तायुक्त प्रमाणीत बियाण्यांचे उत्पादन म

हाराष्ट्रातील प्रगतशील बिजोत्पादक शेतकरी बांधव यांच्यामार्फत घेऊन महाबीज विक्रेता साखळीद्वारे राज्यातील तमाम शेतकऱ्यांना अत्यंत अल्प दरात म्हणजेच ना नफा ना तोटा तत्वावर प्रमाणीत बियाणे उपलब्ध करून देत असल्याने शेतकरी बंधूची प्रथम पसंती हि महाबीज बियाण्याला असेते.

महाबीज हि संस्था भारतातील तसेच राज्यातील कृषी विध्यापीठे यांनी संशोधित केलेल्याच प्रसारित बियाणे वाणांचे उत्पादन करून प्रमाणित बियाणे विक्री करत असल्यामुळे विद्यापीठांच्या संशोधन कार्यास देखील महाबीजमुळे एकप्रकारे गतिशीलता प्राप्त होऊन शेतकर्यांना त्याच वाणाचे शुद्ध व गुणवत्ता युक्त बियाणे मिळते. याचाच एक भाग म्हणून काल दिनांक १७.१२.२०२४ रोजी हिंगणी बुद्रुक तालुका जिल्हा-बीड येथील प्रगतशील शेतकरी श्री. प्रकाश रावसाहेब कुलकर्णी यांच्या शेतावर परभणी कृषी विद्यापीठ संशोधीत तथा प्रसारित झाल्यापासून अल्पावधीत शेतकऱ्यांच्या प्रथम पसंतीस उतरलेला तूर महाबीज-गोदावरी (BDN-२०१३-४१) पांढऱ्या रंगाचे दाणे असलेल्या या वाणाचा पिक प्रात्यक्षिक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक महाबीज बीड चे जिल्हा व्यवस्थापक अजय फुलझेले यांनी केले. सूत्रसंचलन विपणन अधिकारी सचिन धस यांनी केले तर आभार उपसरपंच अंकुश गोरे यांनी मानले. यावेळी पाणी फौंडेशनचे तालुका समन्वयक शिवलेश्वर मेदने, प्रवीण काठवटे, सागर गोरे, विशाल करंडे, विशाल घोलप, कृषी पत्रकार विठ्ठल तात्या घरत, महाबीजचे डीलर योगेश मंत्री व श्री. श्रेणिक कोटेचा परिसरातील शेतकरी सुधाकर गुंजाळ, रामकाका शिंदे, चंदन नाईकवाडे, संजय गुंजाळ, रविंद्र चव्हाण, नितीन देशपांडे, लहू गोरे, चंद्रशेखर कोकणे, रवींद्र चव्हाण, वामन मुंडे, सौरभ निनाळे, खंडाळा येथील शेतकरी गट प्रमुख लताताई चौरेंसह गटातील महिला, वैद्यकिन्ही येथील प्रगतशील शेतकरी प्रकाशकाका कुलकर्णी तथा त्यांचा शेतकरी गट तसेच आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन तथा कार्यक्रम पार पाडणे करिता महाबीज बीडचे कृषी क्षेत्र अधिकारी (विपनन) सचिन धस व कृषी क्षेत्र अधिकारी (उत्पादन) अविनाश केदार यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम पार पाडला.

अधिकार नसताना जिल्हा परिषदेत केल्या नियमबाह्य बदल्या

नियमानुसार कारवाईचे शासनाने काढले आदेश

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकारांना नियमबाह्य बदल्या केल्या असून सदर प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान शासन आणि विभागीय आयुक्त आणि या संदर्भात तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या संदर्भात म्हटले आहे की, दि. २८ जुन २०२४ रोजी जिल्हा परिषदेतील सहाय्यक प्रशासन अधिकारी सुनील नवले, जयलाल राजपुत, अनंत खेडकर, शिवाजी अदमुलवाड यांच्या आर्थिक लाभापोटो नियमबाह्य बदल्या करून आपल्या मर्जीतील संबंधित अधिकाऱ्यांना नियुक्त करण्यात आले आहे.

तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांना प्रतिनियुक्ती व केव्हाही मनमानी बदलीचे अधिकार नसताना व विभागीय आयुक्त यांची पूर्व परवानगी न घेता जिल्हा परिषदेम ध्ये सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी दिं. १० जुलै २०२४ रोजी प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार केली असता दि.१६ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी नितीन पवार यांनी उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेल्या बदल्या संदर्भात पत्र देऊन नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तथापि अद्यापपर्यंत जिल्हा परिषदेने यासंदर्भात सदरील नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेल्या बदल्या रद्द केलेल्या नाहीत अथवा कोणतीही कारवाई केली नाही. शासनाच्या नियमानुसार विभाग बदलीसाठी ५ वर्षे सेवेचा कार्यकाळ पूर्ण करावा लागतो. सर्वसाधारण बदल्यासाठी १० वर्षे सेवाजेष्ठता ग्राह्य धरण्यात येते. प्रशासकीय बदलीसाठी १० वर्षे सेवा आवश्यक आहे. विनंती बदलीसाठी ३ वर्षे सेवा आवश्यक आहे. या व्यतिरिक्त बदल्यांसाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक आहे. किंवा न्यायालयाच्या आदेशाने बदली करता येईल. यापैकी काहीही कारण नसताना आर्थिक लाभ घेऊन आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यांना नियुक्त करुन तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मनमानी कारभार केला आहे. ह्या नियमबाह्य पद्धतीने केलेल्या बदल्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड काय कारवाई करतात? याकडे दबक्या आवाजात चर्चा रंगत असुन जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे लक्ष लागून आहे.

माजलगाव: नाशिक येथे भुजबळ फॉर्म हाऊस बैठकीच्या निमिताने भुजबळ साहेबाची भेट घेतली आस्था काही कामा निमित्त चर्चा करताना उपस्थित अन्ना आयोग राज्य अध्यक्ष तथा समता परिषद राज्य उपाध्यक्ष सुभाष भाऊ राऊत संतोष रासवे बाबुराव रासवे भारत आढाव रामेश्वर थोरात उपस्थित होते.

थोडक्यात

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे अनावरण

नागपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. www.home.maharashtra.gov.in या नावाचे अद्ययावत असे संकेतस्थळ आता माहितीजालकावर उपलब्ध झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या गृह विभागाच्या बैठकीत संकेतस्थळाचे अनावरण झाले. या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच अन्य विविध विभागांचे अतिरिक्त सचिव, प्रधान सचिव तसेच गृह विभाग, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. हे नवीन संकेतस्थळ वापरकर्त्यासाठी सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर विविध जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र कारागृह विभाग, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क (ऑनलाईन सेवा), आपले सरकार, महाराष्ट्र राज्य पोलीस, बृहन्मुंबई पोलीस,महाराष्ट्र सागरी मंडळ, महाराष्ट्र शासन, मोटार वाहन विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमी, केंद्रीय अन्वेषण ब्युरो, पोलीस संशोधन केंद्र, (सीपीआर) पुणे, गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, महाराष्ट्र सुरक्षा दल, मुंबई वाहतूक पोलीस, एनजेडीजी राष्ट्रीय न्यायिक डेटा ग्रिड, देशाच्या सेवेत भारतीय पोलीस, राष्ट्रीय तुरुंग माहिती पोर्टल, ई-प्रोसिक्युशन आदी विभागांचे जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

विधानसभा तालिका अध्यक्ष म्हणून सदस्य चैनसुख संचेती यांची नियुक्ती जाहीर

नागपूर । प्रतिनिधी

विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभा काम काजासाठी सदस्य चैनसुख संचेती यांची तालिका अध्यक्ष म्हणून नियुक्ती जाहीर केली.

स्टेट बँक ऑफ इंडिया राजुरीवेस शाखेत पेन्शनर्स डे व आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

बीड । प्रतिनिधी

सर्व सेवानिवृत्तांनी व त्यांच्या नातेवाईकांच्या ठेवी भारतीय स्टेट बँकेत सुरक्षित आहेत व जादा व्याज मिळविण्यासाठी ठेवाव्यात तसेच बँकेकडून सर्वांना सन्मानजनक वागणूक मिळेल अशी ग्वाही मुख्य व्यवस्थापक राजुरीवेस शाखा बीड श्री. जितेंद्र कर्णे यांनी पेन्शनर्स डे कार्यक्रमात दिली. मंगळवारी बँकेच्या प्रांगणात पेन्शनर्स ॲण्ड सिनीयर सिटीझन असोसिएशन व स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने पेन्शनर्स डे चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा शासकीय रुग्णालय व सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक मेडीकल कॉलेजच्यावतीने आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.भास्करराव सरदेशमुख हे होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद बीडचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.सुरेश केंद्रे, जिल्हा कोषागार अधिकारी श्री.परदेशी, बँकेचे मुख्य शाखेचे योगेश रेंदाळकर, आयुष विभागाचे डॉ.आनंद कुलकर्णी, डॉ. राख, डॉ.दुर्गेश जोशी, डॉ.सौ.मिना हांगे, डॉ.लिमकर आदी मान्यवर व मोठ्या प्रमाणात पेन्शनर्स व ज्येष्ठ नागरीक उपस्थित होते. प्रारंभी प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. प्रास्ताविक संघटनेचे अध्यक्ष ॲड.पी.ए.गोरकर यांनी केले. त्यात त्यांनी पेन्शनर्स डे चे महत्व सांगून युट्युब, व्हॉटस ॲप, सोशल मिडीया आदीवरील फेक बातम्या व माहितीमुळे पेन्शनर्सना मानसिक तसेच आर्थिक धोका होत असल्याचे सांगितले. आयुष्यमानकार्ड प्रत्येक ज्येष्ठ नागरीकांना घरपोच मिळण्यासाठी शासनस्तरावर यंत्रणा उभी करावी अशी मागणी केली व विविध समस्या मांडल्या. दिवंगत सेवानिवृत्तांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

फरार विष्णू चाटे जेरबंद!

बीड । प्रतिनिधी

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा माजी तालुकाध्यक्ष विष्णू चाटे याला बीड पोलिसांनी जेरबंद केले आहे. आतापर्यंत या प्रकरणात चार आरोपीना अटक झाली आहे.

बीड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. दिं .०९ डिसेंबरला संतोष देशमुख यांचा खुन झाला होता. नवव्या दिवशी फरारी चाटेला पकडण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुलेसह इतर दोघे अद्यापही फरार आहेत. चाटे याला पोलिसांनी बीड ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर अटक केल्याची माहिती अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी दिली. मस्साजोग (ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांचे ता. ता. नऊ डिसेंबर रोजी केज जवळून अपहरण करण्यात आले. अपहरणानंतर विष्णू चाटे मयत देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांच्या संपर्कात होता. तुमच्या भावाला आणून सोडायला लावतो असे तो सांगत होता. दरम्यार, अपहरणानंतर केज पोलिसांनी गुन्हा नोंद करण्यास उशिर केला. संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळल्यानंतर सुदर्शन घुले, प्रतिक घुले, सुधीर सांगळे, जयराम चाटे, महेश केदार, कृष्णा आंधळे यांच्यावर गुन्हा नोंद झाला. मात्र, या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करावी आणि मुख्य सुत्रधारांवर गुन्हा नोंद करावा, या मागणीसाठी मस्साजोग तालुक्यातील लोकांनी ता. नऊ रोजीच्या रात्रीपासून ते ता. १० रोजीच्या रात्री पर्यंत आंदोलन केले. दरम्यान, यापूर्वी पोलिसांनी प्रतीक घुले, जयराम चाटे व महेश केदार या तिघांना अटक केली होती. बुधवारी (ता. १८) सकाळी विष्णू चाटेला पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे.

माजलगाव : विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ. प्रकाश सोळंके यांचा लोकनेते सुंदरराव सोळंके साखर कारखान्यावर सत्कार करताना कारखाना कार्यकारी संचालक आर. सी. बडगुजर, सचिव सुरेश लगड, मुख्य शेतकी अधिकारी श्री देशमुख.

राष्ट्रीय ओपन तायक्कांदो स्पर्धेत सेंट अँन्स स्कूलच्या धनंजयने पटकावले सुवर्णपदक

बीड । प्रतिनिधी

गोवा येथील पेडीएम स्टेडियम येथे पार पडलेल्या ४ थी राष्ट्रीय ओपन तायक्कांदो स्पर्धेत सेंट अँन्स स्कूलच्या धनंजय समाधान आत्तरकर याने सुवर्णपदक जिंकले आहे.

तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने गोवा राज्य संघटना आयोजित ४ थी राष्ट्रीय ओपन तायक्कांदो स्पर्धा पेडीएम इंडोर हॉल गोवा येथे १२ ते १५ डिसेंबर २०२४ दरम्यान पार पडली. गोवा सरकारचे क्रीडामंत्री गोविंद गोंडे व तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव ॲड. आर. डी. मंगेशकर, भारतीय

संघटनेचे निरीक्षक संतोष मोहती (ओडीसा), महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, आयोजित समितीचे सचिव महादेव चव्हाण, महाराष्ट्र संघटनेचे कोषाध्यक्ष व्यंकटेश कर्रा यांच्या प्रमुख उपस्थितीम ध्ये स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यजमान गोवा राज्यासह महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, केरळ, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, गुजरात, आसाम, ओडिसा, मनिपुर, नागालँड आदी राज्यातील ८०० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेत सर्वाधिक पदके जिंकून महाराष्ट्र संघाला विजेते पद मिळाले. या स्पर्धेमध्ये सेंट अँन्स स्कूलच्या धनंजय आत्तरकरने सुवर्णपदक पटकावून शाळेचे नाव राष्ट्रीय पातळीवर उंचावले आहे व तसेच या स्पर्धेमध्ये प्रशिक्षक म्हणून शाळेचे क्रीडाशिक्षक शेख अनिस यांनी काम पाहिले. या यशाबद्दल शाळेचे प्राचार्या सिस्टर रोजमीन मॅथ्यू, समन्वय सिस्टर सुहीला, उपप्राचार्या सिस्टर शायनी, सिस्टर सुनीला शाळेचे क्रीडाशिक्षक शेख अनिस, शेख अफरोज, राहुल जंपलवार व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर येथे संकष्ट चतुर्थी निमित्त गायत्री महायज्ञ संपन्न

बीड । प्रतिनिधी

बीड येथील यशवंत नगर मधील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर येथे आज संकष्ट चतुर्थी निमित्त गायत्री महायज्ञ मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.गायत्री तिर्थ शांतिकुंज हरिद्वार च्या आशीर्वादाने हिंदूधर्म व सनातन संस्कृतीच्या परंपरेनुसार व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे आयोजन केले जात आहेत. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ठ वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या प्रेरणेने व ड मंगेश पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १८/१२/२०२४ बुधवार मार्गशीर्ष वद्य संकट चतुर्थी निमित्त गायत्री महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते या गायत्री महायज्ञाला यशवंत नगर, हिंगणी काकडहिरा, हिवरशिंगा, व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या यज्ञ समारंभात सर्वप्रथम तुकाराम पंत जोशी यांनी यजमान महादेव साळुंके यांच्या हस्ते सपत्नीक श्री शिध्दिवीनायक गणरायाचा अभिषेक केला, त्यानंतर गायत्री परिवाराचे बीड जिल्हा समन्वयक ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे यांनी यज्ञ पौरोहित्य केले .जमलेल्या सर्व भाविक भक्तांनी या यज्ञात सामूहिक आहुती टाकून भगवंताचे आशीर्वाद घेतले . या यज्ञसमारंभाला यशवंत नगर, तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त उपस्थित होते.

आई सोबत शेतात गेलेल्या दोन भावंडाचा विहीरित पडून मृत्यु

पाचोड । प्रतिनिधी

आई सोबत शेतात गेलेल्या दोन सख्या भावंडाचा विहीरित पडून मृत्यु झाल्याची दुर्दैवी घटना आज मंगळवारी (दि १७ रोजी) दुपारी १२ वाजेच्या सुमारास पैठण तालुक्यातील रजापुर शिवारात घडली. आडूळ बु येथील कृष्णा विठ्ठल फणसे यांची रजापुर शिवारात गट न २६ मध्ये दोन एक्कर शेती असून त्यांच्या स्वतः च्या शेतात आज मंगळवारी कृष्णा फणसे यांची पत्नी वर्षा फणसे व त्यांची दोन मुले प्रणव व जय असे तिघे जण सकाळी गेले होते.वर्षा फणसे ही शेतातील सोंगलेल्या तुरीचे पेटे एकटी जमा करीत होती तसेच त्यांची दोन्ही मुले बाजुला खेळत असतांना वर्षा हिची नजर चुकुन कठडे नसलेल्या विहीरिकडे ते दोघे जण गेले व तेथे खेळत असतांना त्यांचा तोल जाऊन लहान मुलगा प्रणव वय ६ व मोठा मुलगा जय वय ९ या दोघा सख्या भावंडाचा पाण्यात बुडून मृत्यु झाला.विहीरित पडलेल्या आवाजामुळे वर्षा हि विहीरिकडे पळत सुटली.तिने आरडा ओरड केल्याने आजूबाजूच्या शेतातील नागरिकांनी घटनास्थळी तत्काळ धाव घेऊन पाचोड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथील अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन: महारुद्र महाराज पवार

माजलगाव । प्रतिनिधी

प्रतिनिधी शहरातील जागृत दैवत असलेल्या दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथे अखंड हरिनाम साप्ताह आणि श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन येत्या २२ ते २८ डिसेंबर रोजी करण्यात आले असून या अखंड हरिनाम साप्ताहाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आव्हान आयोजक श्री ह भ प महारुद्र महाराज पवार शिंदेवाडी कर यांनी केले आहे. सर्व

भाविक भक्तांना कळवण्यात येते की भगवंत कृपेने ,सधुसंतांच्या आशीर्वादाने , गुरुवर्य प्रेरणेने व गुरुवर्य नामदेव महाराज चारठाणकर यांच्या शुभाशीर्वादाने या वर्षी ही शहरातील सुप्रसिद्ध असलेले आणि अखंड माजलगाव कारांचे आराध्य दैवत असलेले दक्षिणमुखी हनुमान मंदिर जुने माजलगाव येथे येणाऱ्या २२ते २८ डिसेंबर २०२४ पासून अखंड हरिनाम साप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण साप्ताह चे आयोजिन करण्यात आले आहे या सात दिवसात भागावांचे नाम स्मरण अखंड पणे चालणार असून भजन कीर्तन ,काकडा आरती आदींची मेजवानी भाविकां साठी असणार आहे दैनंदिन कारेक्रम असे राहतील पहाटे ४ ते ६ काकडा भजन ,६ ते ७ विष्णूसहस्रनाम , ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण ,११ ते १ तुकाराम महाराज पारायण गाथा भजन ,सांयकाळी ५ते ६ हरिपाठ आणि रात्री ७ ते ९ महाराष्ट्रातील गुणवान महाराजांचे कीर्तन होणार यात दि २२ रोजी ह भ प विनोदाचार्य दिगंबर महाराज नखाते दि २३ ह भ प भागावताचार्य बाळू महाराज उखळीकर , दि २४ ह भ प गुरुवर्य नामदेव महाराज ढवळे ,दि २५ ह भ प गुरुवर्य विष्णू महाराज जगताप ,दि २६ ह भ प भागवत महाराज बादाडे , दि २७ ह भ प गुरुवर्य एकनाथ महाराज माने.

सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक ह भ प श्री महारुद्र महाराज पवार शिंदेवाडीकर यांनी केले आहे